# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः25.04.2024** **वारःगुरुवार**

---

1. लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातला प्रचार संपला, उद्या मतदान
2. तिसऱ्या टप्प्यातल्या प्रचारालाही वेग
3. व्हीव्हीपॅटच्या शंभर टक्के पडताळणीबाबतचा निर्णय सर्वोच्च न्यायालयानं राखून ठेवला
4. बुलडाणा जिल्ह्यात दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांचा गृह मतदानाला उत्स्फूर्त प्रतिसाद आणि
5. वणी इथं भेसळयुक्त प्रसाद विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर अन्न आणि औषध प्रशासनाची कारवाई

**<u>प्रचार</u>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातला प्रचार काल संपला. काल प्रचाराच्या शेवटच्या दिवशी राज्यात अनेक प्रमुख नेत्यांच्या प्रचारसभा झाल्या. या टप्प्यात राज्यात बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ वाशिम, हिंगोली, नांदेड आणि परभणी मतदारसंघात उद्या मतदान होणार आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी अमरावती जिल्ह्यात परतवाडा इथं पक्षाचे उमेदवार बळवंत वानखेडे यांच्या प्रचारासाठी सभा घेतली. देशात बेरोजगारीनं कळस गाठला असून युवा पिढीची रोजगार मिळवण्यासाठी धडपड सुरू आहे असं राहुल गांधी या सभेत म्हणाले. इंडी आघाडी सत्तेत आल्यास पदवी, पदविका घेतलेल्या विद्यार्थ्यांना सरकारी, सार्वजनिक आणि खाजगी उद्योगांमध्ये शिकाऊ उमेदवारी करण्याचा हक्क देऊ असं आश्वासन त्यांनी यावेळी दिलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हिंगोली जिल्ह्यात वसमत इथं महायुतीचे उमेदवार बाबुराव कोहळीकर यांच्यासाठी प्रचारसभा घेतली. दहा वर्षांपूर्वी जग बोलायचं ते आपल्याला करावं लागायचं मात्र आता आपला देश जे बोलतो ते करायला जग तयार आहे असं मुख्यमंत्री या सभेत म्हणाले. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते उद्धव ठाकरे यांची नांदेडमध्ये प्रचारसभा झाली. देशात हुकूमशाही विरोधात लाट निर्माण झाल्यामुळे राज्यात महाविकास आघाडी तर देशात इंडि आघाडीला यश मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<u>प्रचार तिसरा टप्पा</u>**

दरम्यान, लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातल्या प्रचारालाही आता वेग येत आहे. रत्नागिरी सिंधुदुर्ग मतदारसंघातले महायुतीचे उमेदवार नारायण राणे यांनी काल रत्नागिरीत समाजातल्या बुद्धिजीवी वर्गातल्या मान्यवरांची विशेष बैठक आयोजित केली होती. खासदार म्हणून रत्नागिरीच्या विकासाला वेग देण्याचं काम मी करीन, असं आश्वासन त्यांनी दिलं. भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनीही काल रत्नागिरीत पत्रकार परिषद घेतली. भाजपला संविधान बदलायचं असल्याने '400 पार' चा नारा दिला जात आहे, असा दावा राहुल गांधी करतात. परंतु, काँग्रेसने आतापर्यंत 80 वेळा संविधान बदललं आहे, अशी टीका तावडे यांनी केली.

सोलापूर मतदारसंघातल्या काँग्रेसच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांच्यासाठी राहुल गांधी यांची प्रचारसभा झाली. या सभेत त्यांनी शेतकऱ्यांना शंभर टक्के कर्जमाफी देऊन त्यांच्या शेतीमालाला हमीभाव देण्यासाठी समिती नेमण्याचं आश्वासन दिलं. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार यांनी माढा मतदारसंघाचे उमेदवार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या प्रचारासाठी जाहीर सभा घेतली. सोलापूर जिल्ह्यात विकास कामांवर आणि राजकारणात होणारं अतिक्रमण आपल्याला या निवडणुकीच्या माध्यमातून थांबवायचं आहे असं ते यावेळी म्हणाले. महायुतीच्या बारामती मतदारसंघातल्या उमेदवार सुनेत्रा पवार

यांनी दौंड तालुक्यातल्या हातवळण गावातल्या स्थानिक शेतकऱ्यांशी संवाद साधला आणि त्यांच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडवण्याचं वचन दिलं.

**<u>सर्वोच्च न्यायालय</u>**

मतदारांनी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे दिलेलं मत आणि त्यासंदर्भातली कागदी पावती म्हणजेच व्हीव्हीपॅट यांची शंभर टक्के पडताळणी करण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवरील निर्णय काल सर्वोच्च न्यायालयानं राखून ठेवला. न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपांकर दत्ता यांच्या खंडपीठानं निवडणूक आयोगाला इव्हीएम च्या कार्यपद्धतीबद्दल अनेक प्रश्न विचारले. त्याला उत्तरं देताना, मतदान यंत्रांमध्ये कुठल्याही टप्प्यावर हस्तक्षेप करणं अशक्य असल्याची आयोगानं पुन्हा एकदा हमी दिली. निवडणूक आयोगावर विश्वास व्यक्त करुन सध्याची निवडणूक प्रक्रिया आणखी सशक्त करण्यासाठी काही सुधारणा शक्य असल्यास आपण त्यात लक्ष घालू असं न्यायालयानं सांगितलं. दरम्यान, कागदी मतपत्रिकांच्या वापराची कल्पना न्यायालयानं पुन्हा फेटाळली.

**<u>दिव्यांग आणि ज्येष्ठ मतदार - बुलडाणा</u>**

लोकशाहीच्या महाउत्सवात सर्वांना सहभागी होता यावं यासाठी निवडणूक आयोगाकडून सर्व प्रकारे प्रयत्न केले जात आहेत. याचाच एक भाग म्हणून दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांना आयोगानं गृह मतदानाची सोय उपलब्ध करुन दिली आहे. बुलडाणा जिल्ह्यात याला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. जिल्ह्यात दिव्यांगांच्या मतदानाची टक्केवारी 97 टक्के तर ज्येष्ठ नागरिकांच्या मतदानाची टक्केवारी 90 टक्के नोंदवण्यात आली.

या सुविधेचा लाभ घेतलेल्या बुलडाणा जिल्ह्यातल्या दिव्यांग मतदार रेखा पिंगळे म्हणाल्या......

बुलडाणा जिल्ह्यातल्याच ज्येष्ठ मतदार इंदूताई कुलकर्णी या सुविधेविषयी समाधान व्यक्त करताना म्हणाल्या....

**<u>उमेदवारी अर्ज-अहमदनगर, बीड</u>**

राज्यात लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. अहमदनगर जिल्ह्यातल्या शिर्डी लोकसभा मतदारसंघात वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार उत्कर्षा रुपवते यांनी काल उमेदवारी अर्ज भरला. तर जळगाव जिल्ह्यातल्या जळगाव मतदारसंघात करण पाटील आणि रावेर मतदारसंघात श्रीराम पाटील या महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. त्यानंतर या दोन्ही उमेदवारांच्या प्रचारासाठी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी प्रचारसभा घेतली. बीड लोकसभा मतदारसंघात भाजपाच्या उमेदवार पंकजा मुंडे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

**<u>एफटीआयआय कान्स</u>**

भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी प्रशिक्षण संस्था अर्थात एफटीआयआय च्या चिदानंद नाइक या विद्यार्थ्याच्या चित्रपटाचं 77 व्या कान्स चित्रपट महोत्सवात विशेष कौतुक झालं. त्याच्या सनफ्लॉवर्स वेअर फर्स्ट वन्स टू नो या चित्रपटाची या महोत्सवातल्या ला सिनेफ या स्पर्धात्मक विभागासाठी निवड झाली आहे. या विभागाद्वारे जगभरातल्या चित्रपट प्रशिक्षण संस्थांमधल्या निवडक नव्या प्रतिभावंतांना प्रोत्साहन आणि ओळख मिळवून दिली जाते.

**<u>बाजार समिती-नाशिक</u>**

हमालपट्टी कपात न करताच लिलाव घेण्याच्या वादामुळे गेले 3 आठवडे नाशिक जिल्ह्यातल्या सर्व बाजार समित्या बंद होत्या. त्यानंतर इतर ठिकाणी लिलाव सुरू झाले मात्र येवला, पिंपळगाव बसवंत, नांदगाव आणि मनमाड बाजार समितीतले लिलाव पुन्हा बंद ठेवण्यात आले आहेत. हमाल, माथाडी कामगार आणि व्यापाऱ्यांच्या वादात सामान्य शेतकऱ्यांचे हाल होत असल्याचं वृत्त आमच्या वार्ताहरानं दिलं आहे.

**<u>कारवाई-कोल्हापूर</u>**

कोल्हापूर मतदारसंघात काँग्रेसचे बंडखोरी केलेले उमेदवार बाजीराव खाडे यांना पक्षानं सहा वर्षांसाठी निलंबित केलं आहे. कोल्हापूरचे श्रीमंत शाहू महाराज छत्रपती यांना काँग्रेसनं उमेदवारी दिल्यानंतर नाराज झालेल्या खाडे यांनी अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज दाखल केला आहे.

**<u>कारवाई-नाशिक</u>**

नाशिक जिल्ह्यात वणी इथल्या सप्तशृंग गडावर प्रसादात भेसळ करणाऱ्या विक्रेत्यांवर अन्न आणि औषध प्रशासनानं कारवाई केली आहे. त्यांच्याकडची सुमारे सहा लाख रुपये किमतीची मिठाई नष्ट करण्यात आली आहे. उन्हाळ्याच्या सुट्टीत धार्मिक स्थळांच्या ठिकाणी होणारी गर्दी लक्षात घेता अन्न आणि औषध प्रशासनानं भेसळयुक्त अन्न पदार्थ विक्रेत्यांवर धडक कारवाईची मोहिम हाती घेतली आहे.

**<u>हवामान</u>**

राज्यात मध्य महाराष्ट्र आणि परिसरात चक्रिय स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे तिथं तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे. कोकणात हवामान उष्ण आणि दमट राहण्याची शक्यता असून विदर्भ आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

## याबरोबरच आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.